मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेत ६७१ कोटींचा 'टीडीआर' घोटाळा

## ६७१ कोटींचा फायदा विकासकाला करून दिल्याचा वडेट्टीवार यांनी केला आरोप

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या वतीने मूलभूत नागरी सुविधा देण्यासाठी आरक्षित भूखंडाचा विकास खासगी विकसकामार्फत करताना अधिकाऱ्यांनी अंदाजपत्रक फुगवून जादा सुविधांचा हस्तांतरित विकास हक्क (ॲम्युनिटी टीडीआर) देत ६७१ कोटी रुपयांचा फायदा विकसकाला दिल्याचा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. सरकारने पारदर्शकपणे याची चौकशी केली, तर आयुक्तांसह डझनभर अधिकारी घरी जातील, असा दावाही त्यांनी केला. वडेट्टीवार म्हणाले, की वाकड, भूमकर चौक येथील महापालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक ४/३८ हे ट्रक टर्मिनस व ४/३८ (अ) हे पीएमपी डेपोसाठी आरक्षित आहे. विकास आराखड्यातील समावेशक आरक्षणांच्या तरतुदींनुसार भूखंडमालक विलास जावडेकर इन्फिनिटी प्रा. लि या संस्थेने महापालिकेसोबत सहा नोव्हेंबर २०२३ रोजी एक करार केला. कंपनीने ८७ हजार ३१८ चौरस मीटर बांधकाम करून देण्याच्या मोबदल्यात महापालिकेला सहा लाख ९३ हजार ४४८ चौरस हस्तांतरित विकास हक्क देण्याचे ठरले. या बांधकामाला स्थापत्य विभागाने मंजुरी दिली. त्यानुसार बांधकामाचा खर्च ६५८ कोटी २६ लाख आहे. बांधकामाचे क्षेत्र ७८ हजार ३१८ चौरस मीटर आहे. ६५ हजार ८० रुपये प्रमाणे प्रतिचौरस मीटर बांधकाम खर्चाला मान्यता दिली. प्रत्यक्षात २०२३-२४ च्या रेडी रेकनरनुसार हा दर २६ हजार ६२० रुपये प्रतिचौरस मीटर होतो. परंतु, ३८ हजार ६४० रुपये प्रतिचौरस मीटर जादा दराप्रमाणे प्रकल्पाचे अंदाजपत्रक फुगवले. त्यामुळेच हस्तांतरित विकास हक्कामध्ये मोठी वाढ झाली. ६६५ कोटी रुपयांचा टीडीआर मिळणे अपेक्षित असताना एक हजार १३६ कोटींचा जादा टीडीआर विकसकाला मिळणार आहे. यात ६७१ कोटींचा फायदा महापालिका अधिकाऱ्यांनी विकसकाला करून दिल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.



> “ २१ मजली वाणिज्य वापरासाठी इमारत उभारण्यात येणार आहे. विकसनासाठी आरक्षणाची जागा, संपूर्ण बांधकाम विनामूल्य मिळणार आहे. महापालिकेचे हित विचारात घेऊन, कायदेशीर प्रक्रिया राबवूनच प्रक्रिया केली आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता झाली नाही.
>
> – प्रसाद गायकवाड, उपसंचालक, नगररचना विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पिंपरीत सर्वेक्षणासाठी आलेल्या 'एसआरए'च्या अधिकाऱ्यांना नागरिकांनी लावले हुसकावून!

## स्थानिकांना डावलण्यात येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** चिंचवडच्या काळभोर नगरमधील आदर्श नगर झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या ठिकाणाहून आज अधिकारी दाखल झाले होते. मात्र, या अधिकाऱ्यांना आदर्श नगर झोपडपट्टीतील नागरिकांनी हुसकावून लावले. झोपडपट्टी पुनर्वसन सर्वेक्षण योग्य पद्धतीने होत नसून स्थानिकांना डावलण्यात येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. नागरिकांच्या विरोधामुळे अधिकाऱ्यांनी या ठिकाणाहून काढता पाय घेतला. पिंपरी- चिंचवड शहरातील काळभोर नगर या ठिकाणच्या आदर्श नगर झोपडपट्टीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे येथील अधिकारी सर्वेक्षणासाठी आले होते. आदर्शनगर झोपडपट्टीतील शेकडो नागरिकांनी एकत्र येऊन त्या अधिकाऱ्यांचा विरोध करत त्यांना हुसकावून लावले आहे. नागरिकांचा रोष बघून अधिकाऱ्यांनी काढता पाय घेतला. नागरिकांनी अधिकाऱ्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आदर्शनगर झोपडपट्टीत २०० ते २५० कुटुंब राहतात. प्रत्येक कुटुंबातील विवाहित दाम्पत्याला घर मिळत नाही, तोपर्यंत आमचा या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला विरोध असल्याचं नागरिकांच म्हणणं आहे. गेल्या साठ वर्षांपासून या ठिकाणी नागरिक आहेत. मग, आत्ताच हा प्रकल्प इथे का उभा राहतो आहे. असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे. जोपर्यंत झोपडपट्टीवासीयांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत. तोपर्यंत आमचा या प्रकल्पाला विरोध असेल अशी स्पष्ट भूमिका नागरिकांनी मांडली.



# पिंपरी : प्रशासकीय राजवट सुसाट

## विकास कामांवर करोडो रुपयांची उधळण!

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेत गेल्या पावणेदोन वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. या राजवटीमधील २०२३-२४ या आर्थिक वर्षातील आठ महिन्यांत स्थापत्य विभागाची ५० टक्क्यांहून अधिक रक्कम विविध विकासकामांवर खर्ची झाली आहे. त्यामुळे प्रशासकीय राजवट सुसाट सुरू असल्याचे दिसून येत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहा हजार कोटींचे अंदाजपत्रक आहे. सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागासाठी एक हजार १४६ कोटी ८७ लाख १३ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सिमेंटचे रस्ते, उड्डाणपूल, खडी-मुरुमाचे रस्ते,




जलवाहिन्यांची कामे, पावसाळी गटार, सांडपाणी नलिकांची कामे, पदपथ, नवीन उद्यानांची कामे स्थापत्य विभागाच्या माध्यमातून केली जातात. स्थापत्य विभागाने चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांत महत्त्वाच्या तीन उड्डाणपुलांच्या कामासह रस्त्याच्या कामासाठी मोठी तरतूद खर्च केली आहे. या विभागासाठी एक हजार १४६ कोटी ८७ लाख १३ हजार रुपयांची तरतूद आहे. या तरतुदीपैकी ५७६ कोटी ८३ लाख रुपये विकास कामांवर खर्च केले आहेत, तर ५७० कोटी चार लाख रुपये इतकी तरतूद खर्च करणे बाकी आहे.महापालिकेत गेल्या पावणेदोन वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. या राजवटीमधील २०२३-२४ या आर्थिक वर्षातील आठ महिन्यांत स्थापत्य विभागाची ५० टक्क्यांहून अधिक रक्कम विविध विकासकामांवर

> “ विकासकामांवर ५७६ कोटी रुपये खर्च झाले आहेत. ५७० कोटी चार लाख रुपये तरतूद शिल्लक आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता गृहीत धरून उर्वरित तरतूद विविध विकासकामांवर खर्च होईल.
>
> – मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

खर्ची झाली आहे. त्यामुळे प्रशासकीय राजवट सुसाट सुरू असल्याचे दिसून येत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहा हजार कोटींचे अंदाजपत्रक आहे. सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागासाठी एक हजार १४६ कोटी ८७ लाख १३ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षातील आठ महिन्यांत ५० टक्के रक्कम खर्ची झाली असताना उर्वरित ५० टक्के रक्कम चार महिन्यांत खर्च करावी लागणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी फेब्रुवारी किंवा मार्च २०२४ मध्ये आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे विकासकामे मंजूर करण्यासाठी दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी मिळू शकतो.

# पाणी कपात? व्हायरल मॅसेज खरा की खोटा?

## कोणतीही पाणी कपात होणार नसल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पवना धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यात कपात झाल्यामुळे आजपासून १५ मिनिटांनी पाणी कपात होणार असल्याचा संदेश समाजमाध्यमावर प्रसारित होत आहे. मात्र, हा संदेश खोटा असून कोणतीही पाणी कपात होणार नसल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. रावेत येथील बंधाऱ्यातून अशुद्ध पाणी उपसा करून निगडीतील जलशुद्धीकरण केंद्रातून शहराला पाणीपुरवठा केला जातो. समान पाणीपुरवठा करण्यासाठी मागील चार वर्षांपासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. दररोज पाणीपुरवठा करण्याची नागरिकांची मागणी असताना अधिकचे पाणी उपलब्ध होईपर्यंत दररोज पाणीपुरवठा करण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यातच आता पुन्हा पाणी कपात होणार असल्याचा संदेश समाज माध्यमावर प्रसारित झाला आहे. पवना धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यात कपात झाल्यामुळे




शहर अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्या सुचनेनुसार सर्व ठिकाणचा पाणीपुरवठा आजपासून १५ मिनिटांनी कमी करण्यात येत आहे. याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी व पाणी जपून वापरून महापालिकेस सहकार्य करावे असा संदेश प्रसारित झाला. त्यामुळे आणखी पाणी कपातीचे संकट ओढवणार का असा प्रश्न उपस्थित झाला. पण, हा संदेश खोटा असून पाणी कपात होणार नसल्याचे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी सांगितले. पवना धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यात कपात झाल्यामुळे आजपासून १५ मिनिटांनी पाणी कपात होणार असल्याचा संदेश समाजमाध्यमावर प्रसारित होत आहे. मात्र, हा संदेश खोटा असून कोणतीही पाणी कपात होणार नसल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. रावेत येथील बंधाऱ्यातून अशुद्ध पाणी उपसा करून निगडीतील जलशुद्धीकरण केंद्रातून शहराला पाणीपुरवठा केला जातो. समान पाणीपुरवठा करण्यासाठी मागील चार वर्षांपासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. दररोज पाणीपुरवठा करण्याची नागरिकांची मागणी असताना अधिकचे पाणी उपलब्ध होईपर्यंत दररोज पाणीपुरवठा करण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यातच आता पुन्हा पाणी कपात होणार असल्याचा संदेश समाज माध्यमावर प्रसारित झाला आहे. पवना धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यात कपात झाल्यामुळे शहर अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्या सुचनेनुसार सर्व ठिकाणचा पाणीपुरवठा आजपासून १५ मिनिटांनी कमी करण्यात येत आहे.

# दररोज २०० दशलक्ष लीटर पाण्याची बचत

## पाणीकपात टाळण्यासाठी महापालिकेने घेतला मोठा निर्णय



पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी। शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील घटत्या पाणीसाठ्यामुळे पाणीकपातीची टांगती तलवार असताना पाणी बचतीला महापालिकेने प्राधान्य दिले आहे. पुणे कॅन्टोन्मेंट ते फुरसुंगी जलवाहिनीतून १५० दशलक्ष लीटर पाण्याबरोबरच पाणीपुरवठा यंत्रणेतून ५० दशलक्ष अशा एकूण २०० दशलक्ष लीटर पाण्याची बचत करण्याचा निर्णय पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे. खडकवासला साखळी प्रकल्पातील पाणीसाठा कमी होत असल्याने शहरावर पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले आहे. महापालिकेने पाण्याचा दैनंदिन वापर मर्यादित ठेवण्याबाबतच्या सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्राद्वारे दिल्या आहेत. शहराची तहान भागविण्यासाठी प्रतिदिन १ हजार ६५० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाण्याची आवश्यकता आहे. खडकवासला प्रकल्पात २४.१० अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा शिल्लक असला, तरी त्यापैकी ८.५४ टीएमसी पाणी रब्बी हंगामासाठी आरक्षित आहे. त्यामुळे शहरासाठी असलेल्या १५.५० टीएमसी पाणीसाठ्याचे जूनपर्यंतचे नियोजन महापालिकेला करावे लागणार आहे. सध्याच्या पाणी वापराचा विचार करता पुढील २४४ दिवसांसाठी दैनंदिन वापर १ हजार २५० ते १ हजार ३०० एमएलडी केल्यास २.८० टीएमसी ते ३.२३ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्र देऊन दैनंदिन १ हजार २०० एमएलडी पाणी वापर करावा, अशी सूचना केली आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरठा विभागाने पाणीबचतीला प्राधान्य दिले असून आगामी पाणीटंचाई संकटाच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी कपात न करता योग्य व्यवस्थापनाद्वारे २०० एमएलडी पाण्याची बचत केली जाणार आहे. महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या फुरसुंगी गावाला लवकरच जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा होणार आहे. जलवाहिनी टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, त्यामुळे १५० एमएलडी एवढ्या पाण्याची बचत होणार आहे. या गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी दैनंदिन २० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याची गरज भागविण्यासाठी फुरसुंगीला कालव्यातून पाणीपुरवठा करावा लागत होता. मात्र, त्यासाठी १७२ दशलक्ष लीटर पाणी कालव्यातून सोडावे लागत होते. त्यापैकी १५० दशलक्ष लीटर पाण्याची गळती होत होती. हे काम लवकर पूर्ण झाल्यानंतर १५० एमएलडी पाणी शहरासाठी वापरण्यात येणार आहे. पाणी वितरण व्यवस्थेत बदल करून ५० एमएलडी पाणी बचतीचेही नियोजन करण्यात आले आहे. अशा एकूण २०० एमएलडी पाण्याची बचत करत पाणीकपातीच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी दिली. खडकवासला साखळी प्रकल्पातील पाणीसाठा कमी होत असल्याने शहरावर पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले आहे. सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्राद्वारे दिल्या आहेत. शहराची तहान भागविण्यासाठी प्रतिदिन १ हजार ६५० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाण्याची आवश्यकता आहे. खडकवासला प्रकल्पात २४.१० अब्ज घनफूट पाणीसाठा शिल्लक असला, तरी त्यापैकी ८.५४ टीएमसी पाणी रब्बी हंगामासाठी आरक्षित आहे.

### पुणेकर मतदानापासून वंचित

**» खडकवासला प्रकल्पात २४.१० अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा शिल्लक असला, तरी त्यापैकी ८.५४ टीएमसी पाणी रब्बी हंगामासाठी आरक्षित आहे. त्यामुळे शहरासाठी असलेल्या १५.५० टीएमसी पाणीसाठ्याचे जूनपर्यंतचे नियोजन महापालिकेला करावे लागणार आहे. सध्याच्या पाणी वापराचा विचार करता पुढील २४४ दिवसांसाठी दैनंदिन वापर १ हजार २५० ते १ हजार ३०० एमएलडी केल्यास २.८० टीएमसी ते ३.२३ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्र देऊन दैनंदिन १ हजार २०० एमएलडी पाणी वापर करावा, अशी सूचना केली आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरठा विभागाने पाणीबचतीला प्राधान्य दिले असून आगामी पाणीटंचाई संकटाच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी कपात न करता योग्य व्यवस्थापनाद्वारे २०० एमएलडी पाण्याची बचत केली जाणार आहे. महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या फुरसुंगी गावाला लवकरच जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा होणार आहे. जलवाहिनी टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, त्यामुळे १५० एमएलडी एवढ्या पाण्याची बचत होणार आहे. या गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी दैनंदिन २० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याची गरज भागविण्यासाठी फुरसुंगीला कालव्यातून पाणीपुरवठा करावा लागत होता.**

# पुण्यात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने

## राष्ट्रवादीचे जगताप यांनी पुणे लोकसभेवर दावा केला




पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी। पोटनिवडणुकीत पुणे लोकसभा मतदारसंघ कोणाचा, या मुद्द्यावरून काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोटनिवडणूक असो किंवा सार्वत्रिक निवडणूक पुण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आग्रही आहे, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसने घेतली आहे. मात्र पुणे लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ आहे. त्यामुळे तो सोडण्याचा प्रश्नच नाही, असे काँग्रेसकडून जाहीर करण्यात आले आहे. पुणे लोकसभेची पोटनिवडणूक तातडीने घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र, लोकसभेची मुदत अवघ्या काही महिन्यात संपुष्टात येणार असल्याने पोटनिवडणूक होईल, याबाबत संभ्रमावस्था आहे. मात्र पोटनिवडणूक होईल, या शक्यतेने सर्वच राजकीय पक्षांनी तयारी आणि उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पुणे लोकसभेवर दावा केला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीमध्ये पुणे लोकसभा मतदारसंघ कायम काँग्रेसकडे राहिला आहे. गेली निवडणूकही काँग्रेसनेच लढविली होती. मात्र खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर काही दिवसांतच पोटनिवडणुकीची चर्चा सुरू झाली. महाविकास आघाडीत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे लोकसभा मतदारसंघावर दावा केला होता. आघाडीत ज्याची जास्त ताकद तो मतदारसंघ त्या पक्षाचा असेल, अशी स्पष्ट भूमिका पवार यांनी घेतली होती. त्यानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद सुरू झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून तसे जाहीर फलकही उभारण्यात आले होते. मात्र पोटनिवडणूक होणार नाही, हे लक्षात येताच मतदारसंघ कोणाचा हा मुद्दाही मागे पडला. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे पुन्हा हा मुद्दा चर्चेत आला असून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने या मतदारसंघावर दावा केला आहे.राज्यातील सत्ता समीकरण गेल्या काही महिन्यांत बदलली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. अजित पवार त्यांच्या समर्थक आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये दाखल झाले. त्यामुळे अजित पवार गट पुण्याची पोटनिवडणूक लढविण्याची शक्यता कमीच आहे. सध्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरे यांची महाविकास आघाडी कायम आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसने दावा केल्याने महाविकास आघाडीत वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागणीनंतर काँग्रेसकडून आकडेवारीसह या जागेवर यापूर्वीच दावा करण्यात आला आहे. पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून माजी आमदार मोहन जोशी आणि अनंत गाडगीळ; तसेच प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांची नावे चर्चेत आहेत.

# डोंगरालगत कचरा जाळल्याने नागरी आरोग्य धोक्यात!

## सातत्याने कचऱ्याला आग लावण्याचा प्रकार; नागरिकांतून नाराजी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

येवलेवाडी पाझर तलावालगत डोंगराच्या बाजूला प्लास्टिक, रबर आदींचा कचरा जाळला जात आहेत. आग व धुराचे लोट उठून गुजर-निंबाळकरवाडी, टिळेकरनगर परिसरातील हवेचे प्रदूषण होत आहे. त्याचबरोबर, दुर्गंधी सुटत असून त्यामुळे नागरी आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. येवलेवाडी पाझर तलावजवळ डोंगरालगत गेल्या तीन-चार महिन्यापासून कचरा, प्लास्टिक, रबर, स्क्रॅप व राडाराडा आणून टाकला जात आहे. तसेच तो पेटवून दिला जात आहे.



डोंगरालगत असलेल्या खड्ड्यातुन आग व धुराचे लोट उठत असून येवलेवाडी, टिळेकरनगर, गुजर निंबाळकरवाडी पर्यायाने शहराकडे येत आहेत. सध्या थंडीमुळे धुराचे लोट उंच न जाता ठराविक उंचीपर्यंत राहतात त्यामुळे फार मोठे प्रदूषण होत आहे. २४ तास हे धुराचे लोट वाहत असल्यामुळे परिसरातील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषणाच्या तक्रारीनंतर अग्निशामक विभागाने आग विझवण्यासाठी दोन वाहने पाठवली. मात्र जागा मालकांनी कचऱ्याला लावलेली आग आटोक्यात आणू नका आम्ही ती आटोक्यात आणू असे सांगितल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे. सोसायटीबाहेर किरकोळ कचरा पेटवला तरी सामान्य नागरिकांवर कारवाई होते. तसेच, आयुक्तांनी कचरा पेटवू नये अशा सूचना असताना राजरोसपणे मोठ्या प्रमाणात कचरा पेटवण्यास कुणाची संमती आहे? नागरिकांच्या जीवाला धोका असताना पालिका कुणाला पाठीशी घालत आहे, असा प्रश्न उपस्थित करत तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र पडसात उमटतील असा इशारा माजी नगरसेवक प्रकाश कदम यांनी दिला आहे. तसेच, याबातीत कारवाई करण्यासंदर्भात पालिका आयुक्तांना निवेदन दिले असल्याचेही कदम यांनी सांगितले. येवलेवाडी पाझर तलावालगत डोंगराच्या बाजुला प्लास्टिक, रबर आदींचा कचरा जाळला जात आहेत. आग व धुराचे लोट उठून गुजर-निंबाळकरवाडी, टिळेकरनगर परिसरातील हवेचे प्रदूषण होत आहे. त्याचबरोबर, दुर्गंधी सुटत असून त्यामुळे नागरी आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. येवलेवाडी पाझर तलावजवळ डोंगरालगत गेल्या तीन-चार महिन्यापासून कचरा, प्लास्टिक, रबर, स्क्रॅप व राडाराडा आणून टाकला जात आहे. तसेच तो पेटवून दिला जात आहे. डोंगरालगत असलेल्या खड्ड्यातुन आग व धुराचे लोट उठत असून येवलेवाडी, टिळेकरनगर, गुजर निंबाळकरवाडी पर्यायाने शहराकडे येत आहेत.

> **“सदर परिसरात पाहणी केली आहे. याबाबतीत पुढील काळात अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करुन कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.**
> **- मंगलदास माने, वरिष्ठ आरोग्य निरिक्षक, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय**

# दिशादर्शक बोर्ड अभावी वारकर्यांची होतेय फसगत

## देहूगावात अनेक ठिकाणी दिशादर्शक फलक नसल्याने वारकर्यांची फसगत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

तीर्थक्षेत्र देहूगावमध्ये श्री संत तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी राज्याच्या काना-कोपर्यातून लाखो वारकरी, भाविकभक्त, देहूत येत असतात. येथे येणार्या वारकर्यांच्या माध्यमातून व्यावसायिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते; मात्र देहूगावात अनेक ठिकाणी दिशादर्शक फलक नसल्याने वारकर्यांची फसगत होते. परिणामी, अनेकजण दुरूनच दर्शन घेऊन मार्गस्थ होत असल्याने व्यावसायिकांना ग्राहकांच्या वाटेकडे डोळे लावून बसावे लागत आहे. देहूगावात वैकुंठगमन सोहळा, पालखी प्रस्थान सोहळा, आषाढी आणि कार्तिकी अशा दोन एकादशीनिमित्त लाखो वारकरी येत असतात. या सोहळ्याप्रसंगी स्थानिक दुकानदार, हॉटेल व्यावसायिक, प्रसाद विक्रेते,




मिठाई विक्रेत्यांची आर्थिक उलाढाल होत असते. अनेक कुटुंबांची रोजीरोटी या व्यवसायावर अवलंबून आहे. देहूगाव ठाण्याच्या बाहेरून बायपास रस्ते झाल्याने येणारे वारकरी, भाविकही या रस्त्यांनी ये-जा करत असल्याने येथील व्यावसायिकांच्या व्यवसायावर परिणाम होऊ लागला आहे. शहराचा विकास होणे गरजेचे आहे; परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अत्यावश्यक असते. तसे नियोजन या ठिकाणी दिसून येत नाही. त्यामुळे स्थानिक गावठाण व परिसराला जे महत्त्व होते, ते राहिले नाही.

> **“देहूगावमध्ये दोन बायपास रस्ते झाले आहेत; परंतु या रस्त्यांवर कुठेही मार्गदर्शक, दिशादर्शक फलक लावलेले नाहीत. परिणामी बायपास रस्त्याने येणार्या भाविकांना मंदिर कुठे आहे, याविषयी माहिती मिळत नसल्याने भाविकांचा वेळ येथील ठिकाणे शोधण्यात जातो. परिणामी येथे येणारे भाविक लांबूनच दर्शन घेऊन आपल्या पुढील प्रवासात मार्गस्थ होत आहेत. याकडे देहूनगर पंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचे येथील व्यापारी, दुकानदारांचे म्हणणे आहे.**
> **– महेश मोरे, संत तुकाराम महाराजांचे वंशज**